29-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/28/2025 9:00 PM Page 1



दक्षिण गोवा जिल्हा नियोजन यंत्रणा ठप्प

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



नीरज चोप्रा पुन्हा जागतिक क्रमवारीत अव्वल

पान ४ वर

वेर्णा, रविवार, २९ जून २०२५ । पाने ४ । ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 297 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 29 June 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### पाकमध्ये मोठा आत्मघाती हल्ला; १६ सैनिकांचा मृत्यू

**इस्लामाबाद, दि. २८ :** पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्व्यामधील उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यातील मीर अली खादी मार्केटमध्ये मोठा हल्ला झाला आहे. सुसाईड व्हीईकल बर्न इम्प्रोवाईज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाईसचा वापर या हल्ल्यासाठी करण्यात आला. या आत्मघाती बॉम्ब हल्ल्यात १६ सैनिक मारले गेले आहेत. या हल्ल्यात जखमी झालेल्यांचा आकडा १५ हून अधिक आहे. त्यात महिला आणि बालकांचा आकडा मोठा आहे. यातील अनेक जण गंभीर जखमी आहेत.

सकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी स्फोटकांनी भरलेल्या कारने पाकिस्तानी सैन्याच्या एमआरएपी वाहनाला धडक दिली. त्यावेळी हे वाहन नागरी वस्तीत कर्तव्यावर होतं. पाकिस्तानातील दहशतवादी संघटना तहरीक–ए–तालिबानचा गट उसूद–उल–हर्बनं (इत्तेहाद–उल–मुजाहिद्दीन) हल्ल्याची जबाबदारी घेतलेली आहे. स्फोटकांनी भरलेल्या कारनं धडक दिलेलं वाहन

तहरीक–ए–तालिबाननं अनेकदा पाकिस्तानात आत्मघाती हल्ले घडवून आणले आहेत. पाकिस्तानी सशस्त्र दलांविरोधात त्यांच्याकडून कारवाया केल्या जातात. सैन्य आणि प्रशासनाला लक्ष्य करण्याच्या हेतूनं या दहशतवादी गटाची स्थापना झाली. पाकिस्तानातील सरकार हटवून त्याजागी आपल्या विचारधारेच्या लोकांना आणण्याचा या गटाचा हेतू आहे. त्यांच्याकडून सातत्यानं होत असलेल्या हल्ल्यांमुळे पाकिस्तानी अर्थव्यवस्थेचं मोठं नुकसान झालेलं आहे. गेल्या काही महिन्यांपासून पाकिस्तानातील खैबर पख्तूनख्वा आणि बलुचिस्तान प्रांतांमधील दहशतवादी कारवाया वाढल्या आहेत.

### युद्ध संपताच ट्रम्प यांची इराणला मोठी ऑफर

**वॉशिंग्टन, दि. २८:** अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने इराणसोबत एक नवा करार करण्याची योजना आखली आहे. यात इराणला ३० अब्ज डॉलर्सची मदत, निर्बंधांमध्ये सवलत आणि गोठवण्यात आलेली अब्जावधी डॉलर्सची रक्कम मुक्त करण्याची ऑफर आहे. अमेरिकेने नुकतेच इराणच्या अणू केंद्रांवर हल्ले केले होते. इराणच्या तीन अणू केंद्रांना लक्ष्य करण्यात आले. या कारवाईने इराणचा अणू कार्यक्रम उद्ध्वस्त झाल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. इराणचा अणु कार्यक्रम अनेक वर्षांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर वादाचा मुद्दा राहिला आहे. आमचा अणु कार्यक्रम केवळ शांततापूर्ण उद्दिष्टांसाठी असल्याचा इराणचा आहे. वीज उत्पादन आणि वैद्यकीय संशोधनासाठी अणु कार्यक्रम राबवत असल्याचे इराणकडून सांगण्यात येते. पण अमेरिका, इस्त्रायल आणि इतर पाश्चिमात्य देशांना इराण गुप्तपणे अण्वस्त्र तयार करेल याची भीती वाटते. २०१५ मध्ये इराण आणि सहा जागतिक शक्तींमध्ये (अमेरिका, रशिया, चीन, ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनी) एक ऐतिहासिक करार झाला होता. या कराराला जॉइंट कॉम्प्रिहेन्सिव्ह प्लॅन ऑफ ॲक्शन असे नाव देण्यात आले होते. या अंतर्गत इराणने आपला अणु कार्यक्रम मर्यादित ठेवण्याचे आणि आंतरराष्ट्रीय निरीक्षणास परवानगी देण्याचे मान्य केले होते. या बदल्यात त्यांच्यावरील निर्बंध शिथिल करण्यात आले होते.

प्रस्तावित करारात इराणवरील काही निर्बंध हटवण्याची आणि परदेशी बँकांमध्ये जमा असलेले ६ अब्ज डॉलर्स (जवळपास ४९ हजार कोटी रुपये) मुक्त करण्याची योजना आहे. ही रक्कम २०२३ मध्ये अमेरिका–इराण कैदी अदलाबदली करारात कतारमध्ये जमा करण्यात आली होती. परंतु इराणला ती स्वतंत्रपणे वापरण्याची परवानगी नव्हती. खनिज तेल आधारित अर्थव्यवस्थेला बाधा आणणारे सर्व निर्बंध त्वरित हटवले जावेत, अशी इराणची मागणी आहे.

इराणने युरेनियम संवर्धन पूर्णपणे थांबवावे, अशी अमेरिकेची अट आहे. याउलट आपल्याला अणु संवर्धनाचा अधिकार हवा असल्याचे इराणने वारंवार सांगितलेले आहे.

# माझी बस योजनेचे पुनरुज्जीवन

## खासगी क्षेत्रातील महिलांना तिकीटदरात ५०% सूट

■ टीम दैनिक हेराल्ड :

**डिचोली, दि. २८ : डिचोलीतील रवींद्र भवन येथे शनिवारी झालेल्या कार्यक्रमात माझी बस' या राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनेच्या सुधारीत आवृत्तीचा पुनर्शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी खासगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना बस तिकीट दरात ५० टक्के सवलत जाहीर केली. यासोबतच बसमालकांसाठी विविध सवलती आणि प्रोत्साहन योजना जाहीर करत सरकार वाहतूक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून क्रांती घडवत असल्याचे स्पष्ट केले.**

मुख्यमंत्री डॉ. सावंत म्हणाले, खासगी क्षेत्रातील महिलांसाठी ५०% तिकीट सवलत लागू करण्यात येणार आहे. तसेच, विद्यार्थ्यांना अर्ध्या तिकिटाचा मोबदला थेट बसमालकांच्या बँक खात्यावर जमा केला जाईल.

या योजनेंतर्गत बसमालकांना इंधनावर ३ रुपये प्रति लिटर सवलत, ५०% विमा सवलत आणि नवीन वाहन खरेदीसाठी १० लाख रुपयांचे प्रोत्साहन उपलब्ध करून देण्यात आले आहे. दिवसाला सरासरी २०० किमी बस चालविल्यास मासिक उत्पन्न २ लाखांपर्यंत पोहोचू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. सावंत यांनी सांगितले की, सरकार नवीन कार्ड प्रणाली आणत आहे. एक हजार रुपयांचे कार्ड कोणत्याही 'माझी बस' मध्ये चालेल. प्रत्येक तिकीटाचे पैसे दररोज थेट बसमालकांच्या खात्यात जमा होतील. यामुळे पारदर्शकता वाढेल आणि विश्वास निर्माण होईल.प्रवाशांना मोबाइल ॲपद्वारे बसचे लाईव्ह ट्रॅकिंग' पाहता येणार असून, ही व्यवस्था देशातली पहिली



### कशी आहे नवी 'माझी बस' योजना

- महिलांना ५०% तिकिट सवलत
- इंधनावर ३ रु. प्रति लिटर सवलत
- ५०% विमा अनुदान, नवीन बससाठी १० लाख पर्यंत कर्जसाहाय्य
- डिजिटल पेमेंट आणि कार्ड आधारित प्रणाली
- प्रत्येक प्रवाशाला मोबाईल ॲपद्वारे बस ट्रॅकिंगची सुविधा
- कदंब आणि खासगी बस सेवा यामध्ये समन्वय

अशा प्रकारची डिजिटल सार्वजनिक वाहतूक प्रणाली ठरेल, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांनी खासगी बसचालकांना इशारा देत म्हटले की, प्रवासी मिळवण्यासाठी ओव्हरटेक करत भरधाव बस चालवण्याची गरज नाही. जे बसचालक नियमित रूटवर सेवा देतील, त्यांनाच योजनेचा लाभ दिला जाईल. 'माझी बस' दरम्यान कदंब बस असल्यास, ती हटवली जाईल.

गेल्या योजनेत सरकारने १२ कोटी रुपये खर्च करून ५६ बसमालकांना दीड वर्षात ५० लाख ते १ कोटी रुपये दिले होते.

पान २ ▶





# सासष्टी मधील बेकायदेशीर बांधकाम सर्वेक्षणात अडथळे

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ **सरकारी जमीन सीमांकनाअभावी पंचायती अडचणीत**

**मडगाव, दि. २८ :** सासष्टी तालुक्यात राष्ट्रीय महामार्ग आणि प्रमुख रस्त्यांलगतच्या सरकारी जमिनीवरील बेकायदेशीर बांधकामांचा शोध घेण्याच्या मोहिमेला गंभीर अडथळा निर्माण झाला आहे. या बांधकामांची अचूक ओळख पटवण्यासाठी सुरू असलेल्या सर्वेक्षणाला अनेक पंचायत स्तरावर सरकारी जमिनीच्या स्पष्ट सीमा उपलब्ध नसल्याचा फटका बसतो आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर स्थानिक पंचायती व नगरपालिकांना मुख्य रस्ते, महामार्ग आणि शेती भूखंडांमधील अनधिकृत बांधकामांची ओळख पटवण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आवश्यक सीमांकन नकाशे न मिळाल्यामुळे ही मोहीम अर्धवट स्थितीत अडकली आहे.

सासष्टीतालुक्यातील ३० पैकी केवळ सुमारे १५ पंचायतींनी या संदर्भातील कार्यवाही पूर्ण केली आहे. बीडीओ कार्यालयाच्या आकडेवारीनुसार, नुवे पंचायत क्षेत्रात सर्वाधिक म्हणजे बेकायदेशीर बांधकामे नोंदवण्यात आली असून, त्यापाठोपाठ रुमडामळ मध्ये ३२, राय मध्ये १० , नावेलीत ७ तर कुडतरी मध्ये २ बांधकामे सापडली आहेत.

कामुर्ली , केळशी , लोटली आणि कार्मोना, यांसारख्या पंचायतींनी १ ते ३ बेकायदेशीर बांधकामे नोंदवली आहेत. तर बेतालभाटी , कोलवा , राशोल , सुरावली , वार्का या पंचायतींनी त्यांच्या क्षेत्रात एकही बेकायदेशीर बांधकाम नसल्याचा अहवाल सादर केला आहे , जे आश्चर्यकारक मानले जात आहे.

बीडीओ कार्यालयातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, बहुतेक पंचायतींकडे सरकारी मालकीच्या जमिनीच्या अचूक सीमा दाखवणारी कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. पीडब्ल्यूडीकडे यासाठी वारंवार लेखी विनंत्या करण्यात आल्या आहेत, मात्र अद्याप कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

या विलंबामुळे अनेक पंचायतींनी सर्वेक्षण सुरूच केलेले नाही किंवा त्याचे काम अर्धवट थांबले आहे. अनेक भागांत बेकायदेशीर बांधकामे सार्वजनिक जागांवर, रस्त्यांलगत, वा भातशेतीच्या हद्दीत केली जात असून त्यांची कारवाईसाठी अचूक मालकीचे निर्धारण गरजेचे आहे.

अडथळ्यांवर मात करत काही पंचायतींनी मात्र प्राथमिक माहिती संकलित करून बीडीओ कार्यालयाकडे सादर केली आहे. मात्र, पीडब्ल्यूडी च्या सहकार्याविना संपूर्ण जिल्ह्यातील परिस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेणे आणि कारवाई करणे शक्य होणार नाही, अशी स्पष्ट कबुली स्थानिक अधिकाऱ्यांकडून मिळाली आहे.

या प्रक्रियेत होणाऱ्या विलंबामुळे न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी व बेकायदेशीर बांधकामांवरील कारवाई रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तज्ज्ञांचे मत आहे की, सरकारी यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव हीच या समस्येची मुख्य कारणमीमांसा आहे.

सार्वजनिक हितासाठी आणि पर्यावरणीय व शहरी नियोजनाच्या दृष्टीने ही कारवाई अनिवार्य असून, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने सीमांकन नकाशे आणि मालकीची माहिती उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे, असा सूर आता स्थानिक प्रशासनात उमटत आहे.

# काले रेल्वे स्थानक खनिज प्रस्तावाला तीव्र विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २८ :** सेव्ह मोले' आंदोलनाने आणि गोवा फाउंडेशन संस्थेच्या पाठिंब्याने, राज्यातील पर्यावरणप्रेमींनी काले रेल्वे स्थानकावरील खनिज हाताळणी प्रस्तावाला विरोध करण्यासाठी सार्वजनिक मोहीम सुरू केली आहे.

३० जून रोजी होणाऱ्या गोवा राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव चर्चेत येणार असून, या आधी २० मार्चच्या बैठकीत यावर प्राथमिक चर्चा झाली होती. कर्नाटकातून खनिजाची वाहतूक सुलभ करण्यासाठी वेदांत लिमिटेड व दक्षिण पश्चिम रेल्वेने सादर केलेल्या प्रस्तावात भगवान महावीर अभयारण्य आणि मोले राष्ट्रीय उद्यानातील भागात अयस्क हाताळणी केंद्र सुरू करण्याची योजना आहे.

या प्रस्तावाच्या विरोधात एक खुली नागरिक याचिका आणि सामूहिक इमेल मोहीम सध्या सोशल मीडियावर जोरात आहे. वन्यजीव मंडळाच्या सदस्यांना उद्देशून तयार करण्यात आलेल्या पत्रात, गोव्यातील जंगलांचे आणि वन्यजीवांचे संरक्षण ही तुमची जबाबदारी आहे. कृपया भूमिका न बदलता पर्यावरणाच्या बाजूने उभे रहा, अशी थेट साद घालण्यात आली आहे.

याचिकेत पर्यावरणीय दृष्टिकोनातून स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की , जर या प्रस्तावाला परवानगी मिळाली, तर गोव्यातील संरक्षित क्षेत्रांमध्ये औद्योगिकीकरणाचे दरवाजे उघडतील, आणि हे एक धोकादायक उदाहरण ठरेल.

काले रेल्वे स्थानक गोव्यातील सर्वात जुन्या संरक्षित जंगलांपैकी पश्चिम घाट जैवविविधता पट्ट्यात आहे . कार्यकर्त्यांनी इशारा दिला आहे की, खनिजाच्या वाढत्या हाताळणीमुळे हवा, ध्वनी आणि जलप्रदूषण, यांचे दुष्परिणाम थेट पाणलोट क्षेत्र, वन्यजीव कॉरिडॉर आणि वन आरोग्यावर दिसून येतील.

रेल्वे यार्ड २ किमी लांब हलवले असले तरी रस्त्यांचा वापर कायम राहील, ट्रक्स जंगलात फिरतील, प्रदूषण होईल. त्यामुळे केवळ यार्ड बदलून धोका कमी होत नाही, असे मोहिमेतील आयोजकानी म्हटले आहे .

पर्यावरण गटांनी वन्यजीव मंडळाच्या निर्णय प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, रेल्वे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित राहतात, पण पर्यावरणाच्या बाजूने असलेल्या तज्ज्ञांचे म्हणणे दुर्लक्षित होते.वन्यजीवांसाठी काय योग्य आहे, हे मंडळ ठरवायला हवे .रेल्वेचे ऐकून निर्णय घ्यायला नको असे मोहिमेच्या सदस्यांचे म्हणणे आहे .

सोशल मीडियावर नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की ३० जूनच्या बैठकीपूर्वी आपले अपील ईमेलद्वारे पाठवा.पर्यावरण कार्यकर्त्यांचा स्पष्ट संदेश आहे की , ही लढाई केवळ कालमसाठी नाही, तर राज्यातील सर्व संरक्षित क्षेत्रांसाठी आहे.हे एक पर्यावरणीय धोरणात्मक कसोटीसारखे आहे, आणि यावेळी गोव्यातील शासन आणि मंडळ निसर्गाच्या बाजूने उभे राहतील की खाण कंपन्यांच्या हे स्पष्ट होणार आहे.

# विमान वाहतुकीतील सुरक्षा त्रुटींवर डीजीसीएचे गंभीर निरीक्षण

## तांत्रिक दुर्लक्ष, थकलेले कर्मचारी, धोकादायक धावपट्ट्या आणि दुर्लक्षित सिम्युलेटर वापर उघड

**नवी दिल्ली, दि. २८ :**

२६ जून २०२५ रोजी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए ) जारी केलेल्या प निवेदनात देशातील प्रमुख विमानतळांवरील सुरक्षा चाचण्या, देखभाल त्रुटी आणि व्यवस्थात्मक गोंधळाचे गंभीर नमुने समोर आले आहेत. यामागे १२ जून रोजी अहमदाबादमध्ये घडलेल्या एअर इंडिया अपघाताचे पडसादआहेत.

दिल्ली, मुंबई यांच्यासह अनेक प्रमुख विमानतळांचे ऑडिट करण्यात आले. जरी कोणत्याही विमान कंपनीचे किंवा विमानतळाचे नाव थेट नमूद केले गेले नाही, तरी अहवालात सुरक्षा नियमांचे गंभीर उल्लंघन, नियमांचे दुर्लक्ष, आणि देखभालीतील कमतरता अधोरेखित करण्यात आल्या.

तपासणी दरम्यान, धावपट्ट्यांवरील अस्पष्ट रेषा, तीन वर्षांपासून न अपलोड झालेला अडथळा डेटा, देखभाल लॉगबुकमध्ये दोष नोंद न करणे, अशा गंभीर व्यवस्थात्मक उणिवा नोंदवल्या गेल्या.

या पार्श्वभूमीवर डीजीसीए ने एअर इंडिया कंपनीला तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याचे आदेश दिले. कंपनीकडूनही उत्तर



देण्यात आले की, इंटिग्रेटेड ऑपरेशन्स कंट्रोल सेंटर आता थेट मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या देखरेखीखाली कार्यरत राहणार आहे.

इंटिग्रेटेड ऑपरेशन्स कंट्रोल सेंटर हे प्रत्येक एअरलाइनसाठी उड्डाण नियंत्रणाचे मुख्य केंद्र असून यामार्फत ड्युटी शेड्युलिंग, तांत्रिक समन्वय आणि सुरक्षा देखरेख केली जाते. यामध्ये पायलट, केबिन क्रू, फ्लाइट शेड्युलिंग इ. समाविष्ट आहे.

याबाबत तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या मतांनुसार उड्डाण वेळेचा दबाव खूप असतो. टर्नअराउंड वेळ कमी असल्यामुळे शेवटच्या क्षणी आढळणारे दोष नोंदवले जात नाहीत. विमान देखभाल अभियंते देखील अनेक वेळा चालढकल करतात असे आढळून आले आहे

एका खाजगी पायलटने दिलेल्या माहितीनुसार टियर–२ शहरांतील विमानतळांवर धावपट्टीच्या रेषा अस्पष्ट असतात, गवत वाढलेले असते, आणि जंगली प्राणी उघडपणे दिसतात ज्यात मोर, गायी, हरणांचा समावेश आहे . एका दिवसात पाच सेक्टर फ्लाईट घेतली जाते. क्रू सकाळी ४ वाजल्यापासून ड्युटीवर असतो आणि संध्याकाळी उड्डाण करतो.

डीजीसीए ने म्हटले आहे की अनेक विमानतळांवरील अडथळा मर्यादेचा डेटा ३ वर्षांपासून अपडेट झालेला नाही. विमानतळाजवळ नवीन इमारती उभ्या राहत असूनही कोणतेही परवानगी आधारित सर्वेक्षण राबवले गेलेले नाही.अहवालात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे . पायलटना चुकीच्या सिम्युलेटरवर प्रशिक्षण दिले जात होते. म्हणजे ते विमान ज्या प्रकारचे चालवतात, त्या प्रकाराशी मेळ न बसणाऱ्या सिम्युलेटरवर सराव घेतला जात होता.

# मडगाव शहरात १६ ठिकाणी सीसीटीव्ही बसवणार

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २८ :** गणेश चतुर्थीपूर्वी मडगाव शहरात सुरक्षितता आणि वाहतूक नियंत्रण सुधारण्यासाठी मडगाव नगरपरिषद शहरातील १६ महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा पुन्हा सुरू करणारआहे. हे पाऊल शहराच्या एकूण डिजिटल देखरेखीच्या योजनेचा पहिला टप्पा असून, अंतिमतः शहरभर १०० हून अधिक कॅमेरे बसवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

एमएमसीचे अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, ही यंत्रणा केवळ सुरक्षेसाठी नव्हे तर वाहतूक व्यवस्थापन, अनुशासन आणि कायदा–सुव्यवस्थेसाठी उपयुक्त ठरणार आहे. पहिल्या टप्प्यात १६ ठिकाणी कॅमेरे कार्यरत होतील.

एमएमसी, मडगाव पोलिस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्या संयुक्त समितीने सर्वेक्षण करून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी उच्च–प्राधान्य झोन ठरवले आहेत. ही ठिकाणे मुख्यत्वे गर्दीचे, वाहतूक कोंडीचे किंवा सुरक्षेच्या दृष्टिकोनातून संवेदनशील समजली जातात.आपली प्राथमिकता म्हणजे मुख्य चौक, सार्वजनिक स्थळे आणि वाहतुकीच्या अडचणी असलेली ठिकाणे, असे शिरोडकर यांनी स्पष्ट केले.

याआधी २०१२ मध्ये मडगावमध्ये अशीच एक सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात आली होती. मात्र देखभाल अभावामुळे ती बंद पडली. यंदा मात्र प्रशासनाने यापासून धडा घेत, विक्रेत्यांसोबतच्या करारामध्ये नियमित देखभाल आणि कार्यक्षमतेची जबाबदारी स्पष्टपणे नमूद केली आहे.

शहराच्या एकूण व्यवस्थापन धोरणात, गणेशोत्सव आणि इतर गर्दीच्या काळात वाहतूक नियमन करण्यासाठी पे–पार्किंग झोन सुरू करण्याची योजना आहे. जास्त गर्दीच्या व्यापारी क्षेत्रांमध्ये पे पार्किंगमुळे वाहतूक नियंत्रणात येईल आणि सुरक्षिततेसही हातभार लागेल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.सोनसोडो कचरा प्रकल्प आणि त्याच्या आसपास १० कॅमेरे आधीच बसवण्यात आले आहेत. उर्वरित सहा कॅमेरे पुढील आठवड्यात कार्यान्वित होतील, अशी माहिती प्रशासनाने दिली.